# कोल्हापूर झोनल पुरुष हॉलीबॉल स्पर्धेत सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगुड प्रथम

श्री व्यंकटेश महाविद्यालय येथे कोल्हापूर झोनल पुरुष हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या निर्देशानुसार जयहिंद मंडळाच्या मैदानावर सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. एकूण १२ महाविद्यालयातून संघाने स्पर्धेमध्ये सहभाग घेतला त्यामध्ये सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय संघ प्रथम, डी. आर. माने महाविद्यालय कागल संघ द्वितीय, देवचंद कॉलेज अर्जुन नगर निपाणी संघ तृतीय, तर विवेकानंद कॉलेज कोल्हापूर यांनी चतुर्थ क्रमांक मिळविले. स्पर्धेच्या विजेत्या खेळाडूंना बक्षीस समारंभामध्ये संस्थेचे चेअरमन श्री. कृष्ण बोहरा शेठजी उपस्थित होते, त्यांनी सर्व सहभागी व विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले. अमन नाईकवाडे देवचंद कॉलेज अर्जुन नगर बेस्ट अटॅकर, विजय पाटील डी. आर. माने कॉलेज कागल बेस्ट सेटर, ओंकार लोकरे सदाशिवराव मंडलिक कॉलेज मुरगुड या खेळाडूंना विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. संस्थेचे चेअरमन व महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्याचबरोबर सदर स्पर्धेच्या आयोजन व नियोजनाची जबाबदारी महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक श्री. ए. आय. बाणदार यांनी यशस्वीरित्या पार पडली.

